# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,मुंबई शहर

ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग,फोर्ट, मुंबई - ४०० ००१

Fax.२२६६१२३९ Tel.२२६६५२३३, Email: collector_mumbaicity@maharashtra.gov.in

(महसूल शाखा)


क्रमांक :- सीएसएलआर/मशा-१/टे-२/ मुंबई कोस्टल रोड/२०१७

दिनांक :- ०५ /०७/२०१७.

## जाहीर नोटीस

शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र.जमीन-२५१६/६६५/प्र.क्र.१/ज-२, दि.२४/०५/२०१७ अन्वये मलबार हिल महसूल विभागातील भूकर क्रमांक ९३६ हि मिळकत शासनाने भाडेपट्ट्याने दिली असून, सदर मिळकतीचा भाडेपट्टा २४/०१/१९६२ पासून ९९ वर्षाकरीता देणेत आलेला आहे.

सदर मिळकत नियोजित मुंबई कोस्टल रोडकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित करणेचे अनुषंगाने मलबार हिल महसूल विभागातील भूकर क्रमांक ९३६ मिळकतीचे भाडेपट्टाधारक देवी के. मथानी व सुशिला के. वाटुमल यांना सुनावणी नोटीस पाठविण्यात आली होती. सदर प्रकरणी कार्यालयाचे अभिलेखामधील उपलब्ध पत्त्यावर देखिल पत्र बजावून पंचनामा करणेत आला, परंतु अद्यापही संबंधितांकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. तसेच प्रत्यक्ष मिळकत व अभिलेख्यामधील पत्त्यावर देखिल भाडेपट्टाधारक आढळून आले नाहीत.

तरी या जाहिर नोटीस द्वारे पुनःश्च एकदा कळविणेत येते की, मलबार हिल महसूल विभागातील भूकर क्रमांक ९३६ या मिळकतींबाबत कोणत्याही व्यक्तीचे काही हितसंबंध असलेस १५ दिवसात या कार्यालयात कागदपत्रांसह म्हणणे सादर करावे अन्यथा सदर मिळकतीचा भाडेपट्टा तत्काळ संपुष्टात आणून जमीन शासन जमा करणेकामी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २९४ व २९५ मधील तरतूदी अन्वये पुढील कार्यवाही करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत /-

(संपदा मेहता)

जिल्हाधिकारी, मुंबई शहर